पुण्य नगरी | गुरुवार, १८ जून २०२६

# 'विवेकानंद 'मध्ये नेत्रतपासणी शिबिर

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) आणि नंदादीप नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिराला महाविद्यालयातील सर्व घटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात संदीप देसाई, प्रियांका कांबळे, सोनाई रॉय आणि करण पाटील यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. स्वागत डॉ. संदीप पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट आणि डॉ. पी. आर. बागडे यांनी शिबिराचे नियोजन केले. यावेळी डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. कविता तिवडे, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. नम्रता नरेवाडीकर, रजिस्ट्रार सचिन धनवडे, हितेंद्र साळुंखे, संजय दळवी, सदानंद दुर्गुळे, बबन करपे व कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी कोल्हापूर गुरूवार, १८ जून २०२६



कोल्हापूर : झाडांच्या मुळांचा श्वास मोकळा करण्यासाठी भोवतीचे सिमेंट कॉंक्रीट काढून आळे तयार करताना महापौर रूपाराणी निकम. सोबत मान्यवर व संयोजक.

# झाडांचा श्वास मोकळा करून भूजल पातळी वाढवूया...

## मोहीम लोकचळवळ व्हावी : महापौर, आयुक्तांचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

झाडांचा श्वास मोकळा करा आणि जमीन रिचार्ज करून भूजल पातळी वाढवूया ही मोहीम लोक चळवळ व्हावी. या मोहिमेला कोल्हापूर महानगरपालिका संपूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन महापौर रूपाराणी निकम आणि आयुक्त राजेंद्र भारूड यांनी दिले.

ताराबाई गार्डन परिसरातील झाडांच्या बुंध्याला पडलेले डांबर त्यांच्या हस्ते काढून झाडांना आळे करण्यात आले. कोल्हापूरच्या तापमानाचा पारा ४१ अंशावरून पूर्ववत ३६ अंशांपर्यंत कमी करण्याच्या उद्देशाने आझाद हिंद नेचर आर्मी व राष्ट्रीय ट्रस्टतर्फे महापालिकेच्या सहकार्याने पर्यावरणपूरक मोहीम सुरू केली आहे. यावेळी अध्यक्ष राहुल मगदूम यांनी, शहरातील ५ लाख झाडांना आळे करून दिवसाला किमान शंभर लिटर पाणी जमिनीत मुरले पाहिजे.

यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर योगदान देण्याचे आवाहन केले. यावेळी उपायुक्त शिल्पा दरेकर, उपायुक्त रविकांत आडसूळ, परितोष कंकाळ, नगरसेविका दीपाली घाटगे, वनस्पती तज्ज्ञ सुहास वायंगणकर, सुनील मुळे, परितोष उरकुडे, नितीन कांबळे, नीलेश नाडगोंड यांच्यासह विवेकानंद कॉलेजच्या सहा महाराष्ट्र बटालियनच्या एनसीसी कॅडेट उपस्थित होत्या.

18/6/26 18/6/26